# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहायक विधी
**{ सा.प्र.वि. }** अधिकारी या पदाच्या सेवा जेष्ठता यादीतुन जेष्ठता व योग्यतेच्या आधारे. "विधी अधिकारी" या पदावर (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनमान रु.५६१००-१७७५००) या वेतनश्रेणीत पदोन्ती देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

संदर्भ:- विभागीय पदोन्नती तपासणी समितीचा दि.०२/०९/२०२५ रोजीच्या सभेचा अहवाल व शिफारशी

**टिप:-** महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. नामपा १२२३/प्र.क्र.७१/नवि-२६ दि.१० मे,२०२३ (नागपूर महानगरपालिकेच्या १७८९१ पदांच्या एकत्रित आकृतीबंधास मान्यता) देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. नामपा १२२३/प्र.क्र.७१/नवि-२६, दि. ०८/१२/२०२३ अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र-असाधारण भाग चार-ब (नागपूर शहर महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२३ ला मान्यता राजपत्र प्रसिद्धी दिनांक ०८/१२/२०२३.

शासन पत्र दिनांक २९ डिसेंबर, २०१७ नुसार मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या निर्णयाच्या अधिन राहून "पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत अशी कार्यवाही करतांना सेवाजेष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते दि. २५/०५/२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत. याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावे" असे नमुद होते.

- शासन निर्णय क्र : बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि. ७ मे, २०२१ नुसार खालील प्रमाणे निर्गमित करण्यात आले आहे.

- ➢ मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ या प्रकरणी दि. ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि. २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावीत.
- ➢ जे मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी संदर्भाधित क्र. १ येथील दि. २५/०५/२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले आहेत. असे अधिकारी/कर्मचारी-
  - अ) दि. २५/०५/२००४ रोजी किंवा त्यापूर्वी शासन सेवेत रूजू झाले असल्यास ते त्यांच्या दि. २५/०५/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील.
  - ब) दि. २५/०५/२००४ नंतर शासन सेवेत रूजू झाले असल्यास ते त्यांच्या सेवाप्रवेशाच्या

मूळ सेवाजेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील.

- उक्त पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील, अशी कार्यवाही करतांना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात येऊ नये.
- महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र.एसआरव्ही – २०१८/प्र.क्र.१५९/ कार्यसन १२ दिनांक ०१ ऑगस्ट २०१९ मध्ये राज्य शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना पदोन्ती देण्याकरिता अनुसरावयाच्या कार्यवाही बाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे पदोन्नती करतांना निकटतम निम्न पदावर किमान ३ वर्षाच्या नियमित सेवेची अट पदोन्नतीसाठी पुर्व अट म्हणुन राहील.

उपरोक्त शासन निर्णय तथा तरतुदी विचारात घेवुन दिनांक.२७/०८/२०२४ अन्वये विषयांकित पदाचे प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक.०१/०१/२०२४ रोजीच्या अंतिम जेष्ठता सुचीचे आधारे पदोन्नती तपासणी सभेचे सर्व संमतीने खालील विषयांवर निर्णय घेण्यात आला.

"विधी अधिकारी" वेतनमान (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनमान रू. ५६१००- १७७५००) सहावे वेतन आयोगानुसार रू. १५६००-३९१००-ग्रेड पे ५४०० या पदावर पदोन्नती देण्याबाबत.

नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर विधी अधिकारी या पदाची एकूण मंजूर पद ०१ असून, ०१ पद म.न.पा. संवर्गातील पदोन्नतीचे पद आहे. पदोन्नतीचे ०१ पदापैकी कोणीही अधिकारी कार्यरत नुसन, ०१ पदोन्नतीचे पद रिक्त आहेत.

सेवाप्रवेश नियमानुसार पदोन्नतीसाठी पात्रता :- पदोन्नतीने १०० टक्के

अ) महापालिकेच्या आस्थापनेवरील सहाय्यक विधी अधिकारी संवर्गात ७ वर्षाची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यास पदोन्नतीव्दारे.

विधी अधिकारी या पदाच्या पदोन्नतीच्या कोटयातील एकूण मंजुर जागा-०१, कार्यरत-००, रिक्त-०१

| अ क्र | से जे. क्र. | नांव व पदनाम | जन्म दिनांक | जात | जात वैधता प्रमाणपत्र दिनांक | पदनाम | शैक्षणिक पात्रता | या पदावरील नियुक्ती दिनांक | प्रत वारी | विभागीय चौकशी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | श्री. प्रकाश बरडे | ३१-०१-१९७२ | तेली (OBC) | २५-०१-१९९० | सहाय्यक विधी अधिकारी | B.S.C.. L.L.B, MSCIT | २४-०१-२००३ | ८ | नाही | **पात्र** |
| २ | २ | श्री अजय . माटे | २९-०८-१९७० | महार (SC) | ०८-१२-२००३ | सहाय्यक विधी अधिकारी | B.COM, L.L.B, MSCIT Oct 2005 | ०२-०१-२००४ | ७.४ | नाही | **पद उपलब्ध नाही** |
| ३ | ३ | श्रीसुरज . पारोचे | १५-०७-१९८२ | मेहतर (SC) | -१२-१० १९९८ | सहाय्यक विधी अधिकारी | M.SC.-I,TYP. E-30, MAR-30, MSCIT, LLB-2008 | १३-०८-२००४ | ८.२ | नाही | **पद उपलब नाही** |

विधी अधिकारी या संवर्गातील सेवाजेष्ठता क्र.२,३ वरील अनुक्रमे (२) श्री.अजय माटे (३) श्री.सुरज पारोचे हे अधिकारी आवश्यक असलेले पात्रतेचे निकष जसे, गोपनीय अहवाल, प्रतवारी, आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव, जात वैद्यता, मत्ता व दायित्व विवरणपत्र पुर्ण करीत आहेत परंतु विधी अधिकारी या पदाचे पद उपलब्ध नाही.

विधी अधिकारी या संवर्गातील सेवाजेष्ठता क्र.०१ वरील अनुक्रमे (०१) श्री.प्रकाश बरडे हे अधिकारी आवश्यक असलेले पात्रतेचे निकष जसे, गोपनीय अहवाल, प्रतवारी, आवश्यक शैक्षणिक

अर्हता व अनुभव, जात वैद्यता, मत्ता व दायित्व विवरणपत्र पुर्ण करीत आहेत. तसेच सेवाजेष्ठतेने त्यांना तात्परत्या पदोन्नतीस पात्र ठरवुन विधी अधिकारी या पदावर वेतनमान सातवे वेतन आयोगनुसार ५६१००-१७७५०० (सहावे वेतन आयोगानुसार १५६००-३९१०० ग्रेड पे ५४००) या पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यास समिती शिफारस करीत आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ०८/१२/२०२३ नुसार मंजूर सेवाप्रवेश नियमात पदोन्नतीने नेमणूक करणेबाबत खालीलप्रमाणे तरतूद नमुद आहे.

**पदोन्तीने नेमणूक करणे :-**

विधी अधिकारी हे पद वर्ग-१ चे असून "पदोन्नतीने करावयाची कोणतीही नियुक्ती, जेष्ठता-नि-पात्रता या तत्वावर अर्हता प्राप्त कर्मचाऱ्यांमधून केली जाईल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम-४५ अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग-१ ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना, सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पूर्व मंजुरी घेतल्यानंतरच पदोन्नतीने भरता येईल." अशी तरतूद आहे.

तथापि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ४५(१) (२) व (४) नुसार खालीलप्रमाणे तरतूद आहे.

१) महानगरपालिका वेळोवेळी, योग्य अशा व्यक्तींची शहर अभियंता, वैद्यकीय आरोग्य अधिकारी १{*}व नगरपालिका सचिव म्हणून नेमणूक करील.
२) महानगरपालिकेस, वेळोवेळी [2]{राज्य}शासनाच्या मान्यतेने नगरपालिका उपायुक्ताची एक जागा किंवा नगरपालिका सहायक आयुक्ताची एक जागा किंवा तिला आवश्यक वाटतील इतक्या अशा जागा निर्माण करता येईल, आणि तिला अशा जागांवर योग्य अशा व्यक्तीची किंवा व्यक्तींची नेमणूक करता येईल.
३) या कलमान्वये नेमलेल्या अधिकाऱ्यास नियमाखाली विहीत करण्यात येतील अशा अर्हता असल्या पाहिजेत व त्यास महानगरपालिका[2]{राज्य} शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी निश्चित करील असे मासिक वेतन व भत्ते मिळतील : परंतु, कोणत्याही अधिकाऱ्यांच्या पदाच्या कालावधीत त्यांच्या वेतनात त्यास अहितकारक होईल अशा रितीने फेरबदल करता येणार नाही.
४) नगरपालिका सचिवाच्या नेमणूकी व्यतिरिक्त या कलमान्वये केलेली प्रत्येक नेमणूक २{राज्य} शासनाकडून कायम करण्याच्या अधिन असेल आणि ज्या कोणत्याही अधिकाऱ्याची नेमणूक कायम करण्याचे[2]{राज्य}शासन नाकारील त्यास ताबडतोब पदावरून काढून टाकण्यात येईल.

वरील प्रमाणे तरतूद पाहता, विधी अधिकारी संवर्गाच्या ०१ जागा शासनाचे मंजुरीने नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन शा.नि. दि. १० मे, २०२३ नुसार निर्माण करण्यात आल्या असून, महानगरपालिकेस अशा जागांवर योग्य व्यक्तींची नेमणूक करण्याचे अधिकार असून, अशा नेमणूकीत राज्य शासनाकडून कायम करण्याच्या अधिन राहतील. अशी तरतूद आहे.

उक्त प्रमाणे विधी अधिकारी या पदावरील तात्पुरती पदोन्नती देण्यास दिनांक ०२/०९/२०२५ रोजी झालेल्या पदोन्नती तपासणी समितीने नागपूर महानगरपालिकच्या आस्थापनेवरील सहायक विधी अधिकारी या पदावर कार्यरत संबधित पात्र अधिकाऱ्यांना "विधी अधिकारी" या पदावर

(सातव्या वेतन आयोगानुसार वेतनमान रु. ५६१००-१७७५००) या वेतनश्रेणीत पदोन्नती देण्याची शिफारस केलेली आहे.

प्रस्तुत विषयास महानगरपालिकेच्या मा.प्रशासकाची मंजुरीची आवश्यकता असल्याने व वरील नमुद प्रमाणे पदोन्नती तपासणी समितीने अहवाल सादर करुन पदोन्नतीसाठी शिफारस केली असल्याने "विधी अधिकारी" या पदावर नमुद संबंधितास पदोन्नतीसाठी शिफारस करण्याचा प्रश्न विचारत घेणे.

**टिप :-** सविस्तर टिपणी व कागदपत्रे नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 53/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 15/10/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. आयुक्त (साप्रवि), सामान्य प्रशासन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहायक विधी अधिकारी या पदाच्या सेवा जेष्ठता यादीतुन जेष्ठता व योग्यतेच्या आधारे. "विधी अधिकारी" या पदावर (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनमान रु.५६१००-१७७५००) या वेतनश्रेणीत पदोन्ती देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

संदर्भ:- विभागीय पदोन्नती तपासणी समितीचा दि.०२/०९/२०२५ रोजीच्या सभेचा अहवाल व शिफारशी

**टिप:-** महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. नामपा १२२३/प्र.क्र.७१/नवि-२६ दि.१० मे,२०२३ (नागपूर महानगरपालिकेच्या १७८९१ पदांच्या एकत्रित आकृतीबंधास मान्यता) देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. नामपा १२२३/प्र.क्र.७१/नवि-२६, दि. ०८/१२/२०२३ अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र-असाधारण भाग चार-ब (नागपूर शहर महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२३ ला मान्यता राजपत्र प्रसिद्धी दिनांक ०८/१२/२०२३.

शासन पत्र दिनांक २९ डिसेंबर, २०१७ नुसार मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या निर्णयाच्या अधिन राहून "पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत अशी कार्यवाही करतांना सेवाजेष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते दि. २५/०५/२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत. याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावे" असे नमुद होते.

- शासन निर्णय क्र : बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि. ७ मे, २०२१ नुसार खालील प्रमाणे निर्गमित करण्यात आले आहे.

- मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ या प्रकरणी दि. ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि. २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावीत.
- जे मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी संदर्भाधित क्र. १ येथील दि. २५/०५/२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले आहेत. असे अधिकारी/कर्मचारी-
  - अ) दि. २५/०५/२००४ रोजी किंवा त्यापूर्वी शासन सेवेत रूजू झाले असल्यास ते त्यांच्या दि. २५/०५/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील.
  - ब) दि. २५/०५/२००४ नंतर शासन सेवेत रूजू झाले असल्यास ते त्यांच्या सेवाप्रवेशाच्या मूळ सेवाजेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील.
- उक्त पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील, अशी कार्यवाही करतांना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात येऊ नये.
- महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र.एसआरव्ही – २०१८/प्र.क्र.१५९/ कार्यसन १२ दिनांक ०१ ऑगस्ट २०१९ मध्ये राज्य शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना पदोन्ती देण्याकरिता अनुसरावयाच्या कार्यवाही बाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे पदोन्नती करतांना निकटतम निम्न पदावर किमान ३ वर्षाच्या नियमित सेवेची अट पदोन्नतीसाठी पुर्व अट म्हणुन राहील.

उपरोक्त शासन निर्णय तथा तरतुदी विचारात घेवुन दिनांक.२७/०८/२०२४ अन्वये विषयांकित पदाचे प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक.०१/०१/२०२४ रोजीच्या अंतिम जेष्ठता सुचीचे आधारे पदोन्नती तपासणी सभेचे सर्व संमतीने खालील विषयांवर निर्णय घेण्यात आला.

“विधी अधिकारी” वेतनमान (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनमान रू. ५६१००- १७७५००) सहावे वेतन आयोगानुसार रू. १५६००-३९१००-ग्रेड पे ५४०० या पदावर पदोन्नती देण्याबाबत.

नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर विधी अधिकारी या पदाची एकूण मंजूर पद ०१ असून, ०१ पद म.न.पा. संवर्गातील पदोन्नतीचे पद आहे. पदोन्नतीचे ०१ पदापैकी कोणीही अधिकारी कार्यरत नुसन, ०१ पदोन्नतीचे पद रिक्त आहेत.

सेवाप्रवेश नियमानुसार पदोन्नतीसाठी पात्रता :- पदोन्नतीने १०० टक्के

आ) महापालिकेच्या आस्थापनेवरील सहाय्यक विधी अधिकारी संवर्गात ७ वर्षाची नियमित सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यास पदोन्नतीव्दारे.

विधी अधिकारी या पदाच्या पदोन्नतीच्या कोटयातील एकूण मंजुर जागा-०१, कार्यरत-००, रिक्त-०१

| अ क्र | से जे. क्र. | नांव व पदनाम | जन्म दिनांक | जात | जात वैधता प्रमाणपत्र दिनांक | पदनाम | शैक्षणिक पात्रता | या पदावरील नियुक्ती दिनांक | प्रत वारी | विभागीय चौकशी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | श्री. प्रकाश | ३१-०१-१९७२ | तेली (OBC) | २५-०१-१९९० | सहाय्यक विधी | B.S.C.. L.L.B, MSCIT | २४-०१-२००३ | ८ | नाही | **पात्र** |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बरडे | | | | अधिकारी | | | | | |
| २ | २ | श्री अजय . माटे | २९-०८-१९७० | महार (SC) | ०८-१२-२००३ | सहाय्यक विधी अधिकारी | B.COM, L.L.B, MSCIT Oct 2005 | ०२-०१-२००४ | ७.४ | नाही | **पद उपलब्ध नाही** |
| ३ | ३ | श्रीसुरज . पारोचे | १५-०७-१९८२ | मेहतर (SC) | -१२-१० १९९८ | सहाय्यक विधी अधिकारी | M.SC.-I,TYP. E-30, MAR-30, MSCIT, LLB-2008 | १३-०८-२००४ | ८.२ | नाही | **पद उपलब नाही** |

विधी अधिकारी या संवर्गातील सेवाजेष्ठता क्र.२,३ वरील अनुक्रमे (२) श्री.अजय माटे (३) श्री.सुरज पारोचे हे अधिकारी आवश्यक असलेले पात्रतेचे निकष जसे, गोपनीय अहवाल, प्रतवारी, आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव, जात वैद्यता, मत्ता व दायित्व विवरणपत्र पुर्ण करीत आहेत परंतु विधी अधिकारी या पदाचे पद उपलब्ध नाही.

विधी अधिकारी या संवर्गातील सेवाजेष्ठता क्र.०१ वरील अनुक्रमे (०१) श्री.प्रकाश बरडे हे अधिकारी आवश्यक असलेले पात्रतेचे निकष जसे, गोपनीय अहवाल, प्रतवारी, आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव, जात वैद्यता, मत्ता व दायित्व विवरणपत्र पुर्ण करीत आहेत. तसेच सेवाजेष्ठतेने त्यांना तात्परत्या पदोन्नतीस पात्र ठरवुन विधी अधिकारी या पदावर वेतनमान सातवे वेतन आयोगनुसार ५६१००-१७७५०० (सहावे वेतन आयोगानुसार १५६००-३९१०० ग्रेड पे ५४००) या पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यास समिती शिफारस करीत आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ०८/१२/२०२३ नुसार मंजूर सेवाप्रवेश नियमात पदोन्नतीने नेमणूक करणेबाबत खालीलप्रमाणे तरतूद नमुद आहे.

**पदोन्तीने नेमणूक करणे :-**

विधी अधिकारी हे पद वर्ग-१ चे असून "पदोन्नतीने करावयाची कोणतीही नियुक्ती, जेष्ठता-नि-पात्रता या तत्वावर अर्हता प्राप्त कर्मचाऱ्यांमधून केली जाईल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम-४५ अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग-१ ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना, सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पूर्व मंजुरी घेतल्यानंतरच पदोन्नतीने भरता येईल." अशी तरतूद आहे.

तथापि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ४५(१) (२) व (४) नुसार खालीलप्रमाणे तरतूद आहे.

१) महानगरपालिका वेळोवेळी, योग्य अशा व्यक्तींची शहर अभियंता, वैद्यकीय आरोग्य अधिकारी १{*}व नगरपालिका सचिव म्हणून नेमणूक करील.

२) महानगरपालिकेस, वेळोवेळी [2]{राज्य}शासनाच्या मान्यतेने नगरपालिका उपायुक्ताची एक जागा किंवा नगरपालिका सहायक आयुक्ताची एक जागा किंवा तिला आवश्यक वाटतील इतक्या अशा जागा निर्माण करता येईल, आणि तिला अशा जागांवर योग्य अशा व्यक्तीची किंवा व्यक्तींची नेमणूक करता येईल.

३) या कलमान्वये नेमलेल्या अधिकाऱ्यास नियमाखाली विहीत करण्यात येतील अशा अर्हता असल्या पाहिजेत व त्यास महानगरपालिका[2]{राज्य} शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी निश्चित करील असे मासिक वेतन व भत्ते मिळतील : परंतु, कोणत्याही अधिकाऱ्यांच्या पदाच्या कालावधीत त्यांच्या वेतनात त्यास अहितकारक होईल अशा रितीने फेरबदल करता येणार नाही.

४) नगरपालिका सचिवाच्या नेमणूकी व्यतिरिक्त या कलमान्वये केलेली प्रत्येक नेमणूक २{राज्य} शासनाकडून कायम करण्याच्या अधिन असेल आणि ज्या कोणत्याही अधिकाऱ्याची नेमणूक कायम करण्याचे[2]{राज्य}शासन नाकारील त्यास ताबडतोब पदावरून काढून टाकण्यात येईल.

वरील प्रमाणे तरतूद पाहता, विधी अधिकारी संवर्गाच्या ०१ जागा शासनाचे मंजुरीने नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन शा.नि. दि. १० मे, २०२३ नुसार निर्माण करण्यात आल्या असून, महानगरपालिकेस अशा जागांवर योग्य व्यक्तींची नेमणूक करण्याचे अधिकार असून, अशा नेमणूकीत राज्य शासनाकडून कायम करण्याच्या अधिन राहतील. अशी तरतूद आहे.

उक्त प्रमाणे विधी अधिकारी या पदावरील तात्पुरती पदोन्नती देण्यास दिनांक ०२/०९/२०२५ रोजी झालेल्या पदोन्नती तपासणी समितीने नागपूर महानगरपालिकच्या आस्थापनेवरील सहायक विधी अधिकारी या पदावर कार्यरत संबधित पात्र अधिकाऱ्यांना "विधी अधिकारी" या पदावर (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनमान रु. ५६१००-१७७५००) या वेतनश्रेणीत पदोन्नती देण्याची शिफारस केलेली आहे.

प्रस्तुत विषयास महानगरपालिकेच्या मा.प्रशासकाची मंजुरीची आवश्यकता असल्याने व वरील नमुद प्रमाणे पदोन्नती तपासणी समितीने अहवाल सादर करुन पदोन्नतीसाठी शिफारस केली असल्याने "विधी अधिकारी" या पदावर नमुद संबंधितास पदोन्नतीसाठी शिफारस करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.